॥ सा विद्या या विमुक्तये ॥
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
"ज्ञानतीर्थ परिसर, विष्णुपुरी, नांदेड – ४३१६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED
"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded – 431606 Maharashtra State (INDIA)
Established 17th Septmber 1994-Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'B++' Grade

**SKILL DEVELOPMENT CENTRE**
E-mail: sdc@srtmun.ac.in
Website
www.srtmun.ac.in

SCD/Skill Competition/2026-27 / दिनांक : १५ ऑक्टोबर २०२६

## परिपत्रक इंडिया स्किल स्पर्धा २०२६–२७

**इंडिया स्किल स्पर्धा २०२६–२७ मध्ये सहभागी होण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्याबाबत.**
उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने विद्यापीठ परिसरातील सर्व शैक्षणिक विभाग, संलग्न महाविद्यालये व उपकेंद्रांतीलसर्व विभागप्रमुख, प्राचार्य, शिक्षक आणि विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीकडून प्राप्त सूचनेनुसार **इंडिया स्किल स्पर्धा २०२६–२७** आयोजित करण्यात येत आहे.
या स्पर्धेचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमधील कौशल्यपूर्ण व प्रतिभावान उमेदवारांची ओळख करून त्यांना जिल्हा, राज्य व राष्ट्रीय स्तरावर आपले कौशल्य प्रदर्शित करण्याची संधी उपलब्ध करून देणे हा आहे. या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या व्यावसायिक व तांत्रिक कौशल्यांचा विकास करण्याची तसेच उच्चस्तरीय कौशल्य स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी तयारी करण्याची संधी मिळणार आहे.

**नोंदणीसंबंधी महत्त्वाच्या सूचना :**
१. इच्छुक व पात्र विद्यार्थ्यांनी अधिकृत संकेतस्थळ www.skillindiadigital.gov.in येथे भेट देऊन नोंदणी करावी.
२. नोंदणी करताना आवश्यक माहिती अचूकपणे भरावी.
३. **नोंदणीची अंतिम तारीख १९ ऑक्टोबर २०२६ आहे.**
४. सर्व विभागप्रमुख व प्राचार्य यांनी या परिपत्रकाची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत व्यापक स्वरूपात पोहोचवावी व पात्र विद्यार्थ्यांना वेळेत नोंदणी करण्यासाठी प्रोत्साहित करावे.
५. विद्यापीठ परिसर तसेच सर्व संलग्न महाविद्यालयांमधून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांचा सहभाग सुनिश्चित करण्यासाठी तातडीने आवश्यक कार्यवाही करावी.
अधिक माहितीसाठी व मार्गदर्शनासाठी विद्यार्थ्यांनी **केंद्र कौशल्य विकास (उद्योजकता व व्यावसायिक प्रशिक्षण), स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड** येथे संपर्क साधावा.
सर्व संबंधितांनी या सूचनेची गांभीर्याने दखल घेऊन विद्यार्थ्यांचा जास्तीत जास्त सहभाग सुनिश्चित करावा.

**केंद्र कौशल्य विकास**
(उद्योजकता व व्यावसायिक प्रशिक्षण)
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

**प्रत माहितीस्तव**
१. सर्व प्राचार्य, संलग्न महाविद्यालये
२. संचालक, विद्यापीठ परिसर व उपकेंद्रे, लातूर व परभणी
३. प्राचार्य, न्यू मॉडेल कॉलेज, हिंगोली
४. संचालक, कै. उत्तमराव राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्र, किनवट

मा. कुलगुरू महोदय, विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर परिपत्रक प्रसिद्ध करण्यासाठी कृपया प्रशासकीय मान्यता प्रदान करावी, ही विनंती.

मा. कुलगुरू महोदय